# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## Savitribai Phule Pune University
(formerly University of Pune)

**विद्यापीठ अधिकार मंडळांच्या निवडणुकींसाठी महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि महाविद्यालयीन/परिसंस्थातील विभागप्रमुख या मतदारसंघांच्या दुरुस्त मतदार याद्या प्रसिध्द करणेबाबत**

**जाहीर प्रकटन**

**संदर्भ क्र. १ : साफुपुविनि/१८, दिनांक १८ जून, २०२२**
**संदर्भ क्र. २ : महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरुप परिनियम क्र. १(८)**
**संदर्भ क्र. ३ : साफुपुविनि/९२, दिनांक १४ सप्टेंबर, २०२२**
**संदर्भ क्र. ४ : साफुपुविनि/९४, दिनांक १६ सप्टेंबर, २०२२**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(द)[28(2)(r)] अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील **१० अध्यापक** आणि कलम २८(२)(ध)[28(2)(s)] अन्वये **०३ विद्यापीठ अध्यापक** अधिसभेवर तसेच कलम ३२(३)(छ)[32(3)(g)] अन्वये प्रत्येक विद्याशाखेचे **०२ अध्यापक** विद्यापरिषदेवर व ४०(२)(ग)[40(2)(c)] अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील **०३ विभागप्रमुख** प्रत्येक अभ्यासमंडळावर निवडून द्यावयाचे आहेत. याकरिता मतदार नोंदणी करण्यासाठी संदर्भ क्र. १ अन्वये ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. संदर्भ क्र. २ अनुसार तयार करण्यात आलेल्या उक्त नमूद मतदारसंघाच्या तात्पुरत्या मतदार याद्या तसेच अपात्र ठरलेल्या अर्जांच्या याद्या (कारणासहित) विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर संदर्भ क्र. ३ अन्वये प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. संदर्भ क्र. २ अनुसार तयार करण्यात आलेल्या उक्त नमूद मतदारसंघाच्या दुरुस्त मतदार याद्या विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर या प्रकटनाद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहेत.

सदर दुरुस्त मतदार याद्यांमध्ये मा. कुलसचिव यांच्या निदर्शनास आणून दिलेल्या वगळलेल्या किंवा चुकीच्या नोंदीबाबतच्या हरकती विचारात घेण्यात आल्या आहेत. या हरकतींवरील निर्णयांच्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ अनुसार प्रसिध्द करण्यात येत असलेल्या दुरुस्त मतदार याद्यांबाबत काही अपील करावयाचे असल्यास, संबंधितांनी सदर अपील मा. कुलगुरू यांना संबोधित करून, दुरुस्त मतदार याद्या प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून पाच दिवसांच्या आत म्हणजेच **रविवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०२२ ते गुरुवार, दिनांक ०१ डिसेंबर, २०२२ पर्यंत, कार्यालयीन वेळेत** आवश्यक कागदपत्रांसह समक्ष निवडणूक विभागात अथवा **election@unipune.ac.in** या ईमेल वर पाठविण्यात यावी. विहीत मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा / ई-मेलचा अथवा नव्याने करण्यात येणा-या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**(डॉ. प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/२०९
दिनांक : २६/११/२०२२